## सोनूभाऊ बसवंत कला व वाणीज्य महाविद्यालय ,शहापूर

## इतिहास विभाग वार्षिक अहवाल 2024 – 2025

### एक दिवसीय कार्यशाळा – 30 ऑगस्ट 2024

### महाराष्ट्रातील लेणी स्थापत्यकला

शुक्रवार दि. 30 ऑगस्ट 2024 रोजी इतिहास विभागामार्फत महाराष्ट्रातील लेणी स्थापत्यकला या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयातील माजी इतिहास विभागप्रमुख डॉ.अंकुश सारंग सर लाभले होते. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना लेण्यांची तोंडओळख करून देवून लेण्यांवर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिलकुमार सिंह सर उपस्थित होते. या कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र-संचालन इतिहास विभागातील प्राध्यापिका डॉ.सिमा परटोले यांनी केले. तर प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.जी.जी. सोनवणे यांनी केले.प्रा.प्रविण ठाकरे सरांनी या कार्यशाळेत उपस्थित असणाऱ्यांचे आभार मानले. हि कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी उप-प्राचार्य डॉ.एस.एल.गायकवाड, IQAC समन्वयक डॉ. एस.एस. वाघमोडे यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यशाळेत एकूण 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.